# पीएच.डी; एम. फिल.ची प्रवेश परीक्षा सप्टेंबरमध्येच



**कोल्हापूर, ता. ९ :** शिवाजी विद्यापीठातर्फे होणाऱ्या पीएच. डी, एम. फिल.ची प्रवेश परीक्षा सप्टेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. विद्यापीठ प्रशासन प्रवेश क्षमता किती याची माहिती घेत असून, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे परीक्षेवर परिणाम झाला आहे. परराज्यातील विद्यार्थ्यांनी परीक्षा कशी द्यायची, असा प्रश्न आकाराला आला आहे.

दरवर्षी मेच्या अखेरच्या अथवा जूनच्या पहिल्या आठवड्यात प्रवेश परीक्षा होऊन, त्याचा निकाल महिनाभरात जाहीर होतो. विद्यार्थ्यांच्या मुलाखत प्रक्रियेनंतर प्रवेश निश्चित होतो. परजिल्ह्यासह परराज्यातील विद्यार्थी परीक्षेसाठी दरवर्षी अर्ज करतात. कोरोनामुळे यंदा प्रवेश परीक्षेला लेट होणार असून, परजिल्हा व परराज्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा कशी घेतली जाईल, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव किती दिवस राहील, हे सांगता येत नसल्याने प्रवेश मिळालेल्या परजिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या हजेरीचा प्रश्नही निर्माण होणार आहे.

विद्यापीठ प्रशासनाने सर्व अधिविभागांतील मार्गदर्शकांकडे किती विद्यार्थी पीएच.डी, एम.फिल. साठी आहेत, याची माहिती मागवली आहे. त्यानंतर एकूण किती जागांवर प्रवेश द्यायचा, याची निश्चिती होईल. दरवर्षी साधारणपणे साडे सातशे जागा प्रवेशासाठी उपलब्ध असतात. यंदा हा आकडा किती असेल, याची उत्सुकता आहे. तूर्त प्रवेश परीक्षेच्या हालचाली प्रशासनाच्या पातळीवर सुरू असल्या तरी कोरोनाचे जिल्ह्यातील वाढते रूग्ण पाहता परीक्षेसाठी सप्टेंबर उजाडेल, असा प्रशासकीय सूत्रांचे म्हणणे आहे.

पुढारी

# कोरोनाबाबतची भीती दूर करण्याची गरज : डॉ. पाटील

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय वेबिनार प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना संक्रमितांच्या रोजच वाढत जाणाऱ्या आकडेवारीमुळे सर्वजण दहशतीखाली जीवन जगत आहेत. मात्र, भारताच्या बाबतीत ही भीती आता दूर करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन साथरोग विशेषज्ज्ञ व जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्लूएचओ) नेपाळमधील प्रतिनिधी डॉ. राजन पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागाद्वारे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय वेबिनारमध्ये ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, कोरोना महामारीला अचानक सामोरे गेलेलो नाहीत. लॉकडाऊनमुळे देशात बाधितांच्या संख्येवर नियंत्रण ठेवता आले. माध्यमांनी कोरोनाविषयीचे वृत्तांकन करताना कुठेही घाबरत किंवा दहशत पसरेल असे वृत्त देऊ नये. कोरोनापूर्वी माणूस अहंकारी बनला होता. मात्र, महामारीने हा अहंकार गाळून पडला आहे.

राजस्थान विद्यापीठाचे प्रा. संजीव भानावत म्हणाले, भारतातील माध्यमांनी महामारीच्या काळात योग्य भूमिका घेतली आहे. डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, माध्यमातील बदल पुढील काही वर्षे चालू राहील; परंतु ज्यांना या क्षेत्रात पुढे काम करायचे आहे त्यांनी बहुआयामी असणे गरजेचे आहे. युनिसेफ महाराष्ट्राच्या प्रमुख राजेश्वरी चंद्रशेखर यांनी युनिसेफच्या कार्याचा आढावा घेतला. दुपारच्या सत्रात प्रा. विजय ककडे व मुंबई विद्यापीठाचे प्रा. पी. जे. मार्टिन मॅथ्यू यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. निशा पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तानाजी पाटील, चंद्रशेखर वानखेडे, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी परिश्रम घेतले. सचिन दिवाण यांनी आभार मानले.

लोकमत

# 'ओपन बुक' पद्धतीनुसार परीक्षा घ्याव्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** होम स्टडी आणि ओपन बुक पद्धतीनुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात याव्यात, असा पर्याय कोल्हापुरातील शहाजी लॉ कॉलेजमधील स्टुडंट बार असोसिएशनने सुचविला आहे. त्यासाठी त्यांनी विद्यापीठ, स्वायत्त संस्थांच्या परीक्षांबाबतचे सध्याचे नियम आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घेतला आहे. या पर्यायाचे पत्र त्यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना शनिवारी (दि. ६) पाठविले आहे. या पर्यायाद्वारे फक्त अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षा घेताना शैक्षणिक संस्थेतील संबंधित विषयाच्या प्राध्यापकांना त्यांच्या ज्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य आहे, त्यांना या तंत्रज्ञानाद्वारे, तर अन्य विद्यार्थ्यांना स्पीड पोस्टद्वारे प्रश्नसंच पोहोचविणे, त्यांच्याकडून उत्तरपत्रिका प्राप्त करून घेणे, त्यांचे मूल्यांकन करता येईल. दूरस्थ शिक्षण पद्धतीतील ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्राचे किंवा विषयाचे विषय राहिले असल्यास तो विद्यार्थी शेवटी ज्या सत्रापर्यंत उत्तीर्ण झाला आहे, त्या सत्रापर्यंतच्या सर्व गुणांच्या सरासरीद्वारे गुण देण्यात यावेत, असे या पत्राद्वारे सुचविले आहे. त्याची प्रत पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांना दिली असल्याचे या असोसिएशनचे अध्यक्ष सनी शिर्के, सदस्य सचिन चव्हाण यांनी दिली.

## विद्यार्थी संधींना मुकणार नाही

या पद्धतीने प्राध्यापकांनी केलेले मूल्यांकन विद्यापीठास जमा झाल्याबरोबर लगेच निकाल जाहीर करता येईल. त्यासह पदवी हाती पडल्यामुळे विद्यार्थी भविष्यातील संधींना मुकणार नाही, असे या असोसिएशनने सुचविले आहे.

Kolhapur Main
Page No. 2 Jun 10, 2020
Powered by: erelego.com